शब्दांना सत्याची धार

# प्रहार

मुंबई ● गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६

मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक ३२० ● पाने १० ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in







नारळी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा

## वेचक

### राम मंदिर ट्रस्टचे ३० बँक लॉकर तपासणार

**अयोध्या :** राम मंदिरातील दान चोरी प्रकरणाचा तपास आता प्रत्यक्ष मालमत्ता आणि बँक लॉकरच्या न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) तपासणीपर्यंत पोहोचला आहे. विशेष तपास पथकाने श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे बँकेत असलेले सर्व ३० लॉकर तपासण्यास सुरुवात केली आहे. लॉकरमधील नोंदी आणि प्रत्यक्ष वस्तूंची जुळवाजुळव करणे, तसेच कोणताही ऐवज गहाळ झाला आहे का, हे यादरम्यान तपासले जात आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे चित्रीकरण व्हिडिओ रेकॉर्डिंगद्वारे केले जात असून, पुरावे डिजिटल स्वरूपात पेन ड्राईव्हमध्ये जतन केले जात आहेत. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात हा तपास पूर्ण होण्याची शक्यता आहे. २ सप्टेंबर रोजी होणाऱ्या ट्रस्टच्या बैठकीनंतर एसआयटी आपला अंतिम अहवाल सीलबंद लिफाफ्यात सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करणार आहे.

### केरळचे नवे नाव 'केरळम' अधिसूचित

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृह मंत्रालयाने केरळचे नवे नाव 'केरळम' अधिसूचित केले असून ते मंगळवारपासून प्रभावी झाले आहे. मंगळवारी जारी करण्यात आलेल्या एका राजपत्र अधिसूचनेत गृह मंत्रालयाने म्हटले आहे, "केरळ (नाव परिवर्तन) अधिनियम, २०२६' च्या धारा १ च्या उप-धारा (२) अंतर्गत मिळालेल्या शक्तींचा वापर करत, अधिनियमाचे प्रावधान लागू करण्यासाठी केंद्र सरकारने २५ ऑगस्ट २०२६ ची तारीख निर्धारित केली आहे."

### ब्रिक्ससाठी सुरक्षा यंत्रणा अधिक सतर्क

**नवी दिल्ली :** दिल्लीतील 'भारत मंडपम' येथे होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या तयारीसाठी सुरक्षा यंत्रणांनी कंबर कसली आहे. येत्या परिषदेत सहभागी होणाऱ्या राष्ट्राध्यक्ष आणि परदेशी शिष्टमंडळांच्या सुरक्षेसाठी एक बहुस्तरीय सुरक्षा आराखडा तयार केला जात आहे. विमानतळ, हॉटेल्स आणि परिषदेचे ठिकाण जोडणाऱ्या मार्गांवर सीसीटीव्ही यंत्रणा आणि पाळत ठेवण्याचे कडे अधिक मजबूत केले जात आहेत. गुप्तचर यंत्रणांद्वारे सतत धोक्याचे मूल्यांकन केले जात असून, बहु-एजन्सी केंद्र आणि नॅटग्रिडच्या माध्यमातून केंद्रीय व राज्य यंत्रणांमध्ये रिअल-टाइम माहितीची देवाणघेवाण केली जाईल.

### राहुल गांधींवर कंगना राणावत यांचा पलटवार

**नवी दिल्ली :** अभिनेत्री कृती सेनॉनच्या रक्षाबंधननिमित्तच्या जाहिरातीवर टीका करताना, "बिकिनी घालून भावाला राखी कोण बांधतं?" असा सवाल केला होता. या वादात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कृती सेनॉनची बाजू घेतली. स्त्रीने काय परिधान करावे, ती काय करेल आणि कुठे जाईल, हा तिचा वैयक्तिक निर्णय असल्याचे गांधी यांनी म्हटले. या भूमिकेवर कंगना यांनी प्रत्युत्तर दिले. त्यांनी एक व्यंगचित्र शेअर करत गांधी यांच्या भूमिकेला प्रतिउत्तर देण्याचा प्रयत्न केला.

### धर्मांतरासाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी २२ महिलांवर गुन्हा दाखल

**मोखाडा :** वाकडपाडा येथे १८ वर्षीय तरुणाला धर्मांतरासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करत २२ महिलांविरोधात मोखाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. संबंधित महिलांनी धार्मिक पुस्तक देऊन ते वाचल्यास आजार आणि समस्या दूर होतील, असे सांगितल्याचा आरोप तक्रारीत केला आहे. अक्षय कान्हात याच्या घरी २१ ऑगस्ट रोजी दुपारी काही महिला आल्या होत्या. त्यापैकी एका महिलेने अक्षयला धार्मिक साहित्याचे पुस्तक दिले. हे पुस्तक वाचल्याने आजार बरे होतील आणि जीवनातील समस्या दूर होतील, असा दावा केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# तिबेटमध्ये भूकंप; नेपाळमध्ये महाप्रलय!



**९५ मृत्यू**

**१०५ भारतीय पर्यटकांसह हजारो बेपत्ता**

**भोटेकोशी नदीला अचानक महापूर**

**मानसरोवर यात्रेकरूही संकटात**

**गंडकी नदीवरचे सर्व ३६ दरवाजे उघडले**

◆ **काठमांडू (वृत्तसंस्था) :**

नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात तिबेटमधून वाहणाऱ्या भोटेकोशी नदीला अचानक आलेल्या भीषण पुरामुळे (फ्लॅश फ्लड्स) मोठी जीवित आणि वित्तहानी झाली आहे. कोणत्याही पूर्वसूचनाविना किंवा पावसाशिवाय आलेल्या या महापुरामुळे संपूर्ण नेपाळ हादरले असून, या दुर्घटनेत १०५ भारतीय पर्यटकांसह जवळपास २९१ परदेशी नागरिक बेपत्ता झाल्याची अत्यंत चिंताजनक माहिती नेपाळ पर्यटन बोर्डाने दिली आहे. या संकटामुळे नेपाळमध्ये खळबळ उडाली असून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे.

या महापुरामागचे नेमके कारण अद्याप पूर्णपणे स्पष्ट झालेले नाही. रसुवा जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा अधिकारी नरेंद्र परियार यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्हा मुख्यालय आणि आसपासच्या भागात अजिबात पाऊस नव्हता आणि हवामानही पूर्णपणे स्वच्छ होते. असे असतानाही नदीला अचानक एवढा प्रचंड पूर कसा आला, याचा शोध घेतला जात आहे. वरच्या हिमालयीन भागात एखादे हिमनदी तलाव (ग्लेशियर लेक) फुटले असावे किंवा पाण्याचा तात्पुरता नैसर्गिक अडथळा अचानक तुटल्याने हा महापूर आला असावा, अशी दाट शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे.

#### १२ हेलिकॉप्टर्सच्या मदतीने युद्धपातळीवर रेस्क्यू ऑपरेशन

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत नेपाळ सरकारने युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले आहे. नेपाळी सैन्याची ४ आणि खासगी क्षेत्रातील ८ अशी एकूण १२ हेलिकॉप्टर्स या बचावकार्यात कामाला लावली आहेत. आतापर्यंत नेपाळी सैन्याने हेलिकॉप्टरच्या मदतीने स्याफ्रुबेसी येथून ६, मैलुंग येथून २ आणि धुन्चे येथून ४ अशा एकूण १२ लोकांची सुटका केली आहे. नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांनी सांगितले की, पोलीस, लष्कराचे जवान आणि आपत्कालीन पथके बाधित भागात तैनात करण्यात आली आहेत.

#### शेकडो परदेशी नागरिक बेपत्ता

नेपाळ पर्यटन बोर्डाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, या पुरात जवळपास ४०० हून अधिक लोक बेपत्ता झाले आहेत. यामध्ये २९१ परदेशी नागरिक आणि ९० हून अधिक स्थानिक नागरिकांचा समावेश आहे. बेपत्ता असलेल्या परदेशी पर्यटकांपैकी किमान १०५ भारतीय पर्यटक आहेत.

#### जलविद्युत प्रकल्प आणि रस्ते उद्ध्वस्त

भोटेकोशी नदीच्या पाण्याची अचानक वाढलेली पातळी तिबेट सीमेजवळील तिमुरे आणि स्याफ्रुबेसी परिसरासाठी विनाशाची ठरली. पुराच्या प्रचंड प्रवाहात अनेक बाजारपेठा पाण्याखाली गेल्या असून वाहने, रस्ते, पूल आणि चिलिमे जलविद्युत प्रकल्पासह इतर प्रकल्पांचे अतोनात नुकसान झाले आहे.

#### पंतप्रधान मोदींचा बालन शाह यांना फोन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळचे पंतप्रधान बालन शाह यांना फोन करत चौकशी केली. भारत सर्वतोपरी मदत करण्यास तयार असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. नेपाळमधील पुरामुळे झालेल्या जीवितहानीबद्दल पंतप्रधान मोदींनी दुःख व्यक्त केले. त्यांनी नेपाळचे पंतप्रधान बलेंद्र शाह यांच्याशी संवाद साधला आणि पुरात प्राण गमावलेल्यांप्रति शोक व्यक्त केला.

## हिमनदी फुटल्याने बिहारमध्ये पुराचा धोका

**पाटणा :** नेपाळमधील गंडक नदीच्या वरच्या पाणलोट क्षेत्रात अचानक पूरस्थिती निर्माण झाल्याने आणि पाण्याच्या प्रवाहात अचानक वाढ होण्याची शक्यता असल्याने बिहारमध्ये विशेष दक्षता बाळगली जात आहे. नेपाळमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे तसेच हिमनदी फुटल्याने बिहारमधील काही भागांना पुराचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवारी बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला.

या चर्चेदरम्यान अमित शहा यांनी बिहार सरकारला केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. गरज भासल्यास राज्य प्रशासनाच्या मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथके तैनात करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. केंद्र सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, प्रभावी आपत्ती व्यवस्थापनासाठी बिहार सरकारशी सातत्याने समन्वय साधत आहे. या आपत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, बिहारचे मुख्य सचिव प्रत्यय अमृत यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली.

# प्रेयसीसाठी फोडला 'एमपीएससी'चा पेपर

## पोलिसांच्या अहवालानंतर परीक्षा प्रक्रिया रद्द; हजारो उमेदवारांच्या करिअरला फटका

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक परीक्षेच्या पेपरफुटीमागील एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका तरुणाने आपल्या प्रेयसीसाठी चक्क एमपीएससीचा पेपर फोडल्याची माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे. या गंभीर प्रकारानंतर मुंबई पोलिसांच्या अहवालाच्या आधारे आयोगाने ही संपूर्ण परीक्षा प्रक्रियाच रद्द करण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे हजारो होतकरू उमेदवारांच्या भविष्यावर अनिश्चिततेचे सावट पसरले आहे.

आयोगामार्फत अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक गट-ब संवर्गासाठी २२ मार्च २०२६ रोजी राज्यभरात चाळणी परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी काही उमेदवार आणि लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झाल्या होत्या. त्यानंतर राज्यभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. अखेर पोलीस तपासात या पेपरफुटीमागे एक प्रेम कहाणी असल्याचे स्पष्ट झाले आहे. संबंधित तरुणाने एमपीएससीमधील एका निम्न स्तरावरील कर्मचाऱ्याला हाताशी धरून हा पेपर मिळवल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, फुटलेला हा प्रश्नपत्रिका संच केवळ एकाच व्यक्तीपर्यंत पोहोचला असल्याची प्राथमिक माहिती समोर आली असली, तरी परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता धोक्यात आल्यामुळे आयोगाने संपूर्ण परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. विद्यमान अध्यक्षांनी कार्यभार स्वीकारण्यापूर्वी ही संपूर्ण प्रक्रिया पार पडली होती. या निर्णयामुळे आता संबंधित पदासाठी नव्याने फेरपरीक्षा घेतली जाणार असली, तरी एकाच्या चुकीचा फटका हजारो प्रामाणिक उमेदवारांना बसल्याने राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे.

#### 'या' परीक्षांनाही पेपरफुटीचे ग्रहण

१ याव्यतिरिक्त यंदा राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर पेपरफुटीमुळे दोन महत्त्वाच्या परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घ्यावी लागली. ३ मे रोजी देशपातळीवर घेतलेली 'नीट' ही वैद्यकीय प्रवेश परीक्षा 'गेस पेपर'च्या माध्यमातून प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे केंद्र सरकारने १२ मे रोजी रद्द केली.

२ तसेच महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे २८ जून २०२६ रोजी नियोजित असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) ऐनवेळी, म्हणजेच २७ जूनच्या पहाटे भिवंडीत पोलिसांनी केलेल्या छाप्यात प्रश्नपत्रिका लीक झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे तडकाफडकी स्थगित करण्यात आली.

## औषध निरीक्षक भरती प्रक्रिया रद्द

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक गट-ब या संवर्गासाठी घेण्यात आलेली भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारींच्या आनुषंगाने केलेल्या प्राथमिक चौकशीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला.

आयोगाने २९ जुलै २०२५ रोजी औषध निरीक्षक पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यानुसार २२ मार्च २०२६ रोजी राज्यातील सहा विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी ऑफलाइन पद्धतीने चाळणी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल १२ जून २०२६ रोजी जाहीर करण्यात आला होता. चाळणी परीक्षेनंतर ५०६ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले होते. त्यापैकी ४८८ उमेदवारांच्या मुलाखती १ ते २२ जुलै २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या. २२ जुलै रोजी मुलाखती पूर्ण झाल्यानंतर औषध निरीक्षक पदासाठी पात्र ठरलेल्या ४८५ आणि अपात्र ठरलेल्या तीन, अशा एकूण ४८८ उमेदवारांची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली होती.

दरम्यान, २२ मार्च रोजी झालेल्या चाळणी परीक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत २२ ते २६ जुलैदरम्यान आयोगाला काही उमेदवार तसेच लोकप्रतिनिधींकडून ई-मेलद्वारे तक्रारी प्राप्त झाल्या.

१ आयोगाने २९ जुलै २०२५ रोजी औषध निरीक्षक पदासाठी जाहिरात प्रसिद्ध केली.

२ २२ मार्च २०२६ रोजी राज्यातील सहा विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी ऑफलाइन पद्धतीने चाळणी परीक्षा घेण्यात आली.

३ या परीक्षेचा निकाल १२ जून २०२६ रोजी जाहीर करण्यात आला होता.

४ चाळणी परीक्षेनंतर ५०६ उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरले.

५ ४८८ उमेदवारांच्या मुलाखती १ ते २२ जुलै २०२६ या कालावधीत घेण्यात आल्या.



## अमेरिकेचे इराणवर व्यापक निर्बंध जाहीर

**तेहरान :** अमेरिकेच्या ट्रेझरी डिपार्टमेंट आणि स्टेट डिपार्टमेंटने सोमवारी इराणवर 'ऑपरेशन इकॉनॉमिक आऊटकास्ट' नावाचे व्यापक निर्बंध जाहीर केले आहेत.

या मोहिमेअंतर्गत अमेरिकेने इराणच्या पेट्रोलियम, पेट्रोकेमिकल, जहाजबांधणी, डिजिटल मालमत्ता आणि लष्करी खरेदी नेटवर्कला लक्ष्य केले आहे. अमेरिकेच्या या नव्या निर्बंधांमुळे चार भारतीय कंपन्या आणि काही भारतीय नागरिकांवरही थेट परिणाम झाला असून, चाबहार बंदर प्रकल्प आणि भारत-इराण द्विपक्षीय व्यापारावर संकट ओढवण्याची भीती निर्माण झाली आहे. अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेसेंट यांनी जाहीर केलेले 'ऑपरेशन इकॉनॉमिक आऊटकास्ट' हे एक आर्थिक अभियान आहे, ज्याचा उद्देश इराणला परकीय चलन मिळण्यापासून वंचित ठेवणे हा आहे.

# 'वंदे मातरम्'च्या पूर्ण गायनाला काँग्रेसचा विरोध

## कर्नाटकचे मुख्यमंत्री शिवकुमार निर्णयावर ठाम

◆ **बंगळूरु (वृत्तसंस्था) :**

'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या संपूर्ण गायनाला काँग्रेस पक्षाने विरोध दर्शवला असून, राष्ट्रगीताची केवळ पहिली दोन कडवीच गाण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेसचा हाच निर्णय आता काँग्रेस शासित कर्नाटक सरकारनेही राज्यात लागू केला आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार



यांनी बुधवारी स्पष्ट केले की, वंदे मातरमची केवळ पहिली दोन कडवीच गाण्याच्या काँग्रेस पक्षाच्या निर्णयाचे त्यांचे सरकार पालन करेल आणि ते पक्षाच्या या भूमिकेवर ठाम आहेत.

'इंडिया टुडे राउंडटेबल' या कार्यक्रमात स्वातंत्र्यदिनाच्या सोहळ्यात पूर्ण 'वंदे मातरम्' गायनाबद्दल विचारले असता मुख्यमंत्री शिवकुमार म्हणाले, "माझा माझ्या पक्षाच्या विचारसरणीवर पूर्ण विश्वास आहे. आम्ही जो काही निर्णय घेतला आहे, त्यावर मी ठाम आहे. माझ्या नकळत किंवा राजभवनात कदाचित तसे घडले असावे, परंतु कोणत्याही शासकीय कार्यक्रमांमध्ये आम्ही आमच्या आधीच्या निर्णयावर ठाम राहू."

#### भाजपचा तीव्र आक्षेप

काँग्रेसच्या या निर्णयावर भारतीय जनता पक्षाने तीव्र शब्दांत टीका केली आहे. काँग्रेसने राष्ट्रीय गीताचा अपमान केला असून पक्ष केवळ तुष्टीकरणाचे राजकारण करत असल्याचा गंभीर आरोप भाजपने केला आहे. मात्र, भाजपने केलेल्या या आरोपांना फेटाळून लावत काँग्रेस पक्षाने आणि डी. के. शिवकुमार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे; मात्र यावरुन कर्नाटकातील राजकीय वातावरण तापले आहे.

## ट्रम्प यांचे युद्धविरामाचे श्रेय चुकीचे : सीडीएस अनिल चौहान

**नवी दिल्ली :** 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या सीझफायर कराराबाबत भारताचे माजी चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांनी खळबळजनक दावा केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारत-पाकिस्तानमधील युद्धविरामाचे श्रेय घेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, नवी दिल्लीतील एका कार्यक्रमात माजी सीडीएस अनिल चौहान यांनी ट्रम्प यांचा हा दावा फेटाळून लावला. चौहान यांनी म्हटलं की, "या निर्णयात कोणत्याही तिसऱ्या मध्यस्थाचा सहभाग नव्हता. सीझफायरचा निर्णय दोन्ही देशांच्या सैन्य मोहीम महासंचालक स्तरावर झालेल्या थेट चर्चेनंतर घेण्यात आला होता.

भारताने सीझफायरची घोषणा करण्याआधीच अमेरिकेने त्याबाबत ट्विट केले होते. "आमच्याकडून ही माहिती अजिबात लीक झालेली नव्हती. दोन्ही देशांच्या सैन्याने चर्चेची गोपनीयता राखली होती. त्यामुळे ही गोपनीय माहिती पाकिस्तानी बाजूकडूनच अमेरिकेला पुरवली गेली असण्याची दाट शक्यता आहे," असंही अनिल चौहान म्हणाले. ट्रम्प यांनी दावा केला होता की, अमेरिकेने दिलेल्या टॅरिफच्या धमकीमुळे दोन्ही देश युद्धविरामाला तयार झाले.

# सुट्या खाद्यतेल विक्रीबाबत 'एसओपी' तयार करा!

## मुख्यमंत्र्यांची 'एफडीए'ला सूचना

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) सुट्या खाद्यतेलाबाबत घेतलेल्या कठोर निर्णयामुळे अडचणीत आलेल्या तेल उत्पादक आणि लहान विक्रेत्यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हस्तक्षेप केला आहे. सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर लावण्यात आलेल्या निर्बंधांमुळे छोट्या व्यापाऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या चिंतेची दखल घेत, ग्राहकांच्या सुरक्षेसोबतच पारंपरिक व्यापारही सुरू राहावा यासाठी एक सर्वसमावेशक आणि लवचिक मानक कार्यप्रणाली (एसओपी) तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी एफडीएला दिले आहेत.

एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनाने राज्यभर अन्न सुरक्षेची मोहीम तीव्र करत सुट्या किंवा पॅकिंगशिवाय विकल्या जाणाऱ्या खाद्यतेलाच्या विक्रीविरोधात कठोर पावले उचलली होती. तेलाची गुणवत्ता, योग्य लेबलिंग, साठवणूक आणि भेसळ रोखण्याच्या दृष्टीने घेतलेल्या या



निर्णयामुळे लहान विक्रेते आणि पारंपरिक तेल व्यापाऱ्यांसमोर संकटाची स्थिती निर्माण झाली होती. अनेक मंत्र्यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांचे याकडे लक्ष वेधले होते.

अन्न सुरक्षेची आणि गुणवत्तेची काळजी घेतानाच छोट्या व्यावसायिकांच्या व्यवसायावर अनावश्यक गदा येणार नाही, यादृष्टीने मध्यम मार्ग काढणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. तेलातील भेसळ पूर्णपणे रोखली जावी आणि त्याचवेळी पारंपरिक व्यवसाय सुरळीत सुरू ठेवण्याची मुभा देणारी 'एसओपी' तातडीने तयार करावी, असे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे एफडीएच्या या नव्या 'एसओपी'कडे आता व्यापारी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# गणेशोत्सवात महाप्रसादासाठी लागणार परवाना

## आयुक्त तुकाराम मुंढे; भंडाऱ्यावरही असणार 'एफडीए'ची नजर

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांततर्फे आयोजित करण्यात येणारा महाप्रसाद आणि भंडारा अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) नियमांच्या अधीन असणार आहे. सण-उत्सव कोणताही असला तरी अन्न सुरक्षा कायद्यानुसार 'फूड बिझनेस ऑपरेटर' म्हणून नोंदणीकृत परवाना घेणे आणि नियमांचे पालन करणे गरजेचे असल्याचे एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी बुधवारी स्पष्ट केले आहे. मुंबई प्रेस क्लब येथे आयोजित 'मीट द मीडिया' कार्यक्रमात त्यांनी अन्न सुरक्षेच्या मुद्यावर प्रशासनाची भूमिका मांडली.

गणेशोत्सवात वितरीत केल्या जाणाऱ्या महाप्रसादावर एफडीएची नजर असणार का, या प्रश्नावर बोलताना तुकाराम मुंढे म्हणाले की, हा विषय सण किंवा उत्सवाचा नसून तो नियमांच्या अंमलबजावणीचा आहे. कायद्यानुसार प्रत्येक अन्न व्यावसायिकाने परवाना घेणे आवश्यक आहे. विनापरवाना किंवा मानकांशिवाय अन्नपदार्थ तयार करणे हा नियमभंग



ठरतो, त्यामुळे फेस्टिव्ह सीझन असो वा नसो, नियमांचे पालन ही एक नियमित प्रक्रिया आहे. गणेशोत्सव असो, ईद किंवा अन्य सण, महाप्रसाद करणाऱ्या आयोजकांनीही या नियमांचे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

#### ३ हजार १०० हून अधिक आस्थापनांची तपासणी

अन्न सुरक्षेबाबत कठोर भूमिका घेत एफडीएने ३१ जुलैपर्यंत राज्यभरात अन्न क्षेत्रातील ३ हजार १०० हून अधिक आस्थापनांची तपासणी केली आहे. या कारवाईदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १६५ आस्थापनांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले आहेत, तर ७५० हून अधिक आस्थापनांना सुधारणा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. दरम्यान, कारवाईनंतर अनेक हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सनी स्वतःहून स्वयंपाकघराचे नूतनीकरण व स्वच्छता मोहीम हाती घेतल्याचे सांगत, व्यावसायिकांनी स्वतःहून नियमांचे पालन केल्यास नियामकाची गरजच उरणार नाही, असा विश्वासही मुंढे यांनी व्यक्त केला.